महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

| | |
|---|---|
| दूरध्वनी क्र. ०२२ २७५६०१४५<br>इ-मेल - cadreexam२०२३@gmail.com<br>Website: https://mahadma.maharashtra.gov.in | ७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी. बेलापूर,<br>रेल्वे स्टेशन जवळ (पु) नवी मुंबई-४००६१४. |

नपप्रसं/कक्ष-३ अ/संवर्ग पदभरती/कागदपत्र पडताळणी/२०२६/2466485 दि. 09 SEP 2026

## उमेदवारांना सूचना

**विषय :-** नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट-क परीक्षा २०२३ च्या महाराष्ट्र नगर परिषद कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी क भाग ३ अंतिम निवडसूची आणि भाग ४ अतिरिक्त अंतिम निवडसूचीमध्ये नमूद उमेदवारांचे कागदपत्र पडताळणीबाबत.

**संदर्भ :-**
१. शासन निर्णय सा. प्र. वि क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०४ मे २०२२
२. शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ डिसेंबर २०२५
३. शासन निर्णय सा. प्र. वि. क्र. प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि. ०२ फेब्रुवारी २०२६
४. शासन पत्र न. वि. वि. पत्र क्र.एम सो ओ२०२६/प्र.क्र.१११/ नवि-१४ दि. ११ ऑगस्ट २०२६

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा गट क पदभरतीकरिता दि. ११ जुलै, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर दि. २५ ऑक्टोबर, २०२३ ते २४ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षेत उमेदवारांना संवर्गनिहाय प्राप्त झालेले गुण नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते.

दि. ११ जुलै, २०२३ रोजीच्या जाहिरातीत संवर्गनिहाय व श्रेणीनिहाय नमूद रिक्त पदांच्या संख्येनुसार सदर परीक्षेतील पात्र उमेदवारांची गुणानुक्रमानुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेवून एकूण ८ संवर्गांची भाग-१ प्रारुप निवडसूची व भाग-२ अतिरिक्त प्रारुप निवडसूची (प्रतिक्षायादी) दि. १० जून, २०२४ रोजी संचालनालयाच्या https://mahadma.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक ४ मध्ये नमूद शासन पत्र दि. ११ ऑगस्ट २०२६ मध्ये नमूद केल्यानुसार," सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०४ /०५/ २०२२ रोजीच्या शासन निर्णयांमध्ये नमूद तरतुदींची पूर्तता करणाऱ्या तसेच ज्या समांतर आरक्षण संवर्गात उमेदवार उपलब्ध असतील त्या त्या प्रवर्गाच्या उमेदवारांची निवड सूची या विभागाच्या (सामान्य प्रशासन विभागाच्या) दिनांक २ डिसेंबर २०२५ व २ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत लावता येईल."

वरील निदेशानुसार संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या भाग तीन अंतिम निवड सूची आणि भाग चार अतिरिक्त अंतिम निवड सूचीतील उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे

शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र, वयाबाबत पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतीसह तसेच कागदपत्र पडताळणीकरीता सोबत जोडलेले "कागदपत्र तपासणी प्रपत्र" उमेदवारांनी भरुन प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन स्वत: कागदपत्र पडताळणीकरीता **सिंधुदुर्ग ,खारघर प्रभाग समिती अ कार्यालय,सेक्टर १९,भूखंड क्रमांक १४, रामशेठ ठाकूर शाळेजवळ खारघर.नवी मुंबई."** येथे खालील नमूद वेळी समक्ष उपस्थित रहावे. उमेदवारांच्या वतीने त्यांच्या प्रतिनिधींना कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहता येणार नाही, राहिल्यास त्यांची कागदपत्र पडताळणी करण्यात येणार नाही.

| अ.क्र | पदाचे नाव | दस्ताऐवज पडताळणी दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | महाराष्ट्र नगर परिषद कर निर्धारण व प्रशासकीय सेवा श्रेणी क ( भाग -३ अंतिम निवडसूची व भाग ४ अतिरिक्त अंतिम निवडसूची (प्रतीक्षासूची) | ११ सप्टेंबर, २०२६ वेळ : ११.०० वाजता |

उमेदवारांनी आपणास नेमून दिलेल्या तारखेस व वेळेत उपस्थित रहावे.

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्टयर्थ आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मूळ कागदपत्रे खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १. | एस.एस.सी प्रमाणपत्र |
| २. | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे. |
| ३. | वयाचे पुराव्याबाबत सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेला जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला |
| ४. | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र. |
| ५. | अनुसुचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधता प्रमाणपत्र. |
| ६. | वैध नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र. |
| ७. | दिव्यांग व्यक्ती प्रमाणपत्र. |
| ८. | माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र / युध्दात / सैन्यदलातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा अपंग झाल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| ९. | क्रीडा प्रमाणपत्र व क्रीडा पडताळणी प्रमाणपत्र |
| १०. | अनाथ प्रमाणपत्र. |
| ११. | अंशकालीन पदवीधर /पदवीकाधारक प्रमाणपत्र. |
| १२. | भुकंपग्रस्त प्रमाणपत्र. |
| १३. | प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र. |
| १४. | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी. |
| १५. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला / डोमिसाईल प्रमाणपत्र. |



| | |
|---|---|
| १६. | ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अथवा अनुभवास प्राधान्य आहे अशा पदाकरीता उमेदवारा अनुभव नमूद केला असल्यास -<br>१. नियोक्त्याने दिलेला नियुक्ती आदेश<br>२. नियोक्त्याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन चिठ्ठी (पेमेंट स्लिप) ज्यात उमेदवाराचा आयडी क्रमांक बँकेचे नाव नमुद असेल.<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथव बँक स्टेटमेंट. |

उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

निवडसूची कालमर्यादा संपण्यास कालावधी कमी असल्यामुळे उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन निवड रद्द केली जाईल व तद्नंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

संबंधित उमेदवारांनी खोटे व दिशाभूलकरणारे कागदपत्र सादर केल्याचे दिसून आल्यास किंवा विविध संवर्गाचे ऑनलाईन अर्ज सादर करताना अपलोड केलेले कागदपत्रे आणि प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीवेळी सादर केली जाणारी कागदपत्रे यांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

दस्तऐवज पडताळणीकरीता उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे असून दस्तऐवज पडताळणी प्रक्रियेबाबत मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी अंती नियुक्ती देण्यासंदर्भात सर्वस्वी अधिकार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या निवड समितीकडे राहतील.

(अभिषेक कृष्णा भा.प्र.से.)
अध्यक्ष, निवड समिती व आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई